# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांकः- २९/०१/२०१७

काल दिनांक २८/०१/२०१७ रोजी सैनु गोटा व त्यांची पत्नी शीला गोटा यांना नागपूर येथून गडचिरोली पोलीस पथकाने अटक केली. त्यावेळी त्यांचेसोबत 'त्या' दोन महिला ही मिळून आल्या. तेव्हा  'त्या' दोघींनी पोलीस पथकाकडे सैनु गोटा यांनी आम्हाला जबरदस्तीने नागपूरला घेवून आल्याची माहिती दिली. त्यामुळे गडचिरोली पोलीस पथकाने त्यांना नागपूर येथील बर्डी पोलीस स्टेशनला नेऊन त्यांची एफ.आय.आर. नोंदवून घेतली.

ॲड. निहालसिंग राठोड यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या हॅबीयस कॉरपस याचीकेवर सुनावणी करताना आज मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दोन्ही बाजु ऐकून घेतल्यानंतर ॲड. राठोड यांची दोन्ही महिलांचा ताबा देण्याची मागणी नाकारत त्यांना सध्या आहे तेथे म्हणजेच वनीता विकास गृहामध्ये ठेवावे असा आदेश दिला. तसेच सदर केस रेग्युलर बेंच समक्ष चालेल असे निर्देश दिले व पोलीसांनीही दोन्ही महिलांशी वनीता विकास गृहामध्ये संपर्क ठेऊ नये असे निर्देश दिले.